# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१

Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १२-२०२२** **दिनांक ११/०१/२०२२**

## चिंचोटी हायवेवर चालते वाहन थांबवुन दरोडा टाकणाऱ्या टोळीस गुन्हे शाखेकडुन तात्काळ अटक

वालीव पो. ठाणे गु.र.नं. १५/२०२२ भा.दं.वि.स. कलम ३९५ प्रमाणे या गुन्ह्यातील फिर्यादी पुरणसिंग ख्यालीसिंग राजपुत वय-३१ वर्षे, व्यवसाय-नोकरी, रा- रुम नं २१, दालमिल कंपाऊंड, पेल्हार नाालासोपारा पुर्व ता.वसई, जि.पालघर.मुळ रा.चरसुना ता.हमनोर जि.राजसमध राज्य-राज्यस्थान हे दि.०३/१/२०२२ रोजी रात्रौ ०९.०० ते ०९.३० वा दरम्याने दि.३/१/२०२२ रोजी रात्रौ ०९.०० ते ०९.३० वा दरम्याने मौजे चिंचोटी गावचे हददीत सतिवली खिंडीत चिचोटी ओव्हर ब्रिजच्या पुढे त्यांचे ताब्यातील आय टेन या प्रवासादरम्यान बंद पडलेल्या गाडीचे टोईंग व्हॅनसोबत प्रवास करीत असताना गुन्हयातील ७ ते ८ आरोपीत यांनी त्यांचे ताब्यातील मोटार सायकल टोईग व्हॅनला आडवी लावुन टोईंग व्हॅनमध्ये घुसुन फिर्यादी यांच्या डाव्या हाताचे बोटांवर कोयत्याने वार करुन दुखापत करुन ड्रायव्हर प्रेमसिंग यास उजव्या पायाचे गुडघ्यावर धारदार हत्याराने जबर मारहाण करुन त्यांचे कडे असलेल्या १४,९०,०००/-रु असलेली बॅग व मोबाईल फोन असा एकुण १५,००,०००/- रुपयेचा ऐवज चोरुन नेल्याबाबत गुन्हयातील फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक ०४/०१/२०२२ रोजी ०५.५६ वा. गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा कोणी केला याबाबत कोणतेही धागेदोरे हाती नव्हते.

सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे नमुद दरोडयाच्या गुन्हयाचा समांतर तपासा करता गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे अधिकारी व अमंलदार यांची वेगवेगळी पथके तयार करुन घटनास्थळी भेट देवुन हायवेवरील घटनास्थळ असलेल्या सातिवली खिंड या ठिकाणापासुन ते दहीसर चेक नाका पर्यंतच्या हायवेवरील उपलब्ध सी सी टी व्ही कॅमेरामधील फुटेजचे परीक्षणातुन व गुप्त बातमीदाराकरवी मजेरा, ता. कुंभलगड, जि. राजसमंध, राज्य- राजस्थान या ठिकाणी राहणारे आरोपीत असल्याची माहीती प्राप्त झाल्याने तात्काळ राजस्थान येथे गुन्हे शाखा-२ वसई व मध्यवर्ती गुन्हे शाखा मधील अधीकारी व अमंलदार यांचे एक तपास पथकास रवाना करुन तेथे आरोपीत नामे १) पुरुष इसम वय २८ वर्ष ग्राम- वलावतोकी भागल, पोस्ट-मजेरा, ता. कुंभलगड, जि- राजसमंध, राज्य-राजस्थान यास ताब्यात घेवून त्याचेकडे केलेल्या चौकशीतुन त्याचे व्यतिरीक्त नमुद गुन्हयात सहभागी असलेल्या आरोपीत २) पुरुष इसम वय २७ वर्ष ३) पुरुष इसम वय २४ वर्ष ४) पुरुष इसम वय ३१ वर्ष अशा एकुण ४ आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले. त्यांचे चौकशीतून नमुद आरोपीत यांचे सोबत नमुद गुन्हा करणेकरीता मुंबई वडाळा येथील ईतर आरोपीत साथीदार असल्याची माहीती प्राप्त झाल्याने उर्वरीत आरोपीत ५) पुरुष इसम वय २८ वर्ष ६) पुरुष इसम वय २७ वर्ष रा. वडाळा, मुंबई यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडुन गुन्हयातील रोख रक्कम व वापरलेली वाहने हस्तगत करण्यात येत आहेत.

सदरची कारवाई. श्री डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, मध्यवर्ती गुन्हे शाखेचे पोनिरी/ राहूल राख, सपोनि/रणजीतसिंग परदेशी, सपोनिरी/सुहास कांबळे, सपोनिरी/ ज्ञानेश्वर जगताप, सपोनिरी/ दत्तात्रय सरक, सपोनि/अमोल आंबवणे, पो.हवा./ ९५०२१ मंगेश चव्हाण, पो.हवा./ ९५०१३ रमेश भोसले, पो.हवा./०३०४९ महेश पागधरे, पो.हवा/०३०५२ चंदन मोरे, पोहवा/०६०२५ सचिन पाटील, पोहवा/विकास यादव, पो.ना./०७०९४ प्रशांत पाटील, पो.ना./०५०३३ जगदीश गोवारी, पोना/ ०६१०७ रमेश आलदर, पोना/शिवाजी पाटील, पो.कॉ./१२०९७ अमोल कोरे, पो कॉ/१२०४७ दादा आडके, पो कॉ/१२०५३ सुधीर नरळे यांनी केली आहे.